# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
# परिपत्रक

**प्रति,**
**मा. प्राचार्य/संचालक,**
**सर्व सातारा जिल्हयातील**
**संलग्नीत महाविद्यालये,**
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

**विषय:-** सातारा जिल्हयातील संलग्नीत महाविद्यालयांनी महाडिबीटी पोर्टलवर त्यांचे प्रोफाईलला अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय योग्य ते शुल्क रक्कम नोंद करणेबाबत...
**संदर्भ:-** सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचेकडील जा.क्र. सआसकसा /भासशि /DBT फिमंजुरी /२०-२१/६६७ दि. ०८/०२/२०२१ रोजीचे पत्र

**महोदय/महोदया,**

महाडिबीटी पोर्टलवर भारत सरकार शिष्यवृत्ती/शिक्षण फि परिक्षा फि संदर्भाने सातारा जिल्हयातील विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालयांनी त्यांचे प्रोफाईलमध्ये अभ्यासक्रम व शैक्षणिक वर्षनिहाय योग्य ते शुल्क नमुद केले आहे याची खातरजमा करावी. शुल्क नमूद करताना अधिक / कमी शुल्क नमूद झाल्यास विद्यार्थ्यांचे होणारे आर्थिक नुकसानीस संबंधित महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन जबाबदार राहिल याची नोंद घेण्यात यावी. याअनुषंगाने सोबत जोडलेल्या संदर्भाकीत पत्रानुसार योग्य ती कार्यवाही करून अहवाल या कार्यालयास इमेलद्वारा सादर करावा.

**आदेशान्वये**

**उपकुलसचिव**
**संलग्नता टी-२ विभाग**

**सोबत- वरीलप्रमाणे**

**संदर्भ क्र. संलग्नता टी-२/** 617
**दिनांक-** 31 MAR 2021

D:\KAUSTUBH\Circular 2019.docx

SHIVAJI UNIVERSITY
Vice Chancellor's Office
Date 13/03/2021
Inward No. 180
To Whom PVC/ Aff. T-2

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
सहायक आयुक्त, समाज कल्याण सातारा यांचे कार्यालय

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बॉम्बे रेस्टॉरंट चौक, सातारा ४१५००३
दूरध्वनी क्र. (०२१६२) २९८१०६ E mail- acswosatara@gmail.com

क्र.सआसकसा/भासशि/DBTफिमंजुरी/२०-२१/ 967 दिनांक : ०८/०२/२०२१

Shivaji University, Kolhapur
Vice Chancellor Office
Date 14/03/2021
Inward No. 891
To Whom Affi T-2

प्रति,
प्राचार्य,
कनिष्ठ, वरिष्ठ/ अनुदानित/विनाअनुदानित,
तांत्रिक/औषधनिर्माण/नर्सिंग/वैद्यक/कृषी इ. महाविद्यालये
जिल्हा, सातारा

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे मंजुर होणा-या शुल्काबाबत

संदर्भ : १) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्रमांक इबीसी- २०१७/प्र.क्र.४०३/ शिक्षण-१ मंत्रालय मुंबई दिनांक ०७/०८/२०१७
२) सामान्य प्रशासन विभाग (मातं) शासन निर्णय क्र. सातवि-मातंस-२०१८/प्र.क्र.१३८/से-१/३९ मंत्रालय मुंबई दिनांक १२/१०/२०१८
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१८/प्र.क्र.४८४/ शिक्षण-१ मंत्रालय मुंबई दिनांक ०८/०१/२०१९
४) विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन परिपत्रक क्रमांक इबीसी-२०१७/प्र.क्र.४५/ शिक्षण मंत्रालय मुंबई दिनांक १९/०१/२०१९

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासुन भारत सरकार शिष्यवृत्ती/ शिक्षण फि परिक्षा फि या योजना राबविण्यासाठी शासनाने संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये Mahadbt हे संकेतस्थळ विकसीत केलेले आहे. सदर संकेतस्थळावर विद्यार्थी ऑनलाईन अर्ज करुन पडताळणी करिता संबंधित महाविद्यालयाकडे सदरचा अर्ज सादर करतात. सदर अर्ज महाविद्यालयाकडुन आवश्यक कागदपत्रांची व अभ्यासक्रमनिहाय तसेच वर्गनिहाय फि ची पडताळणी करुन पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज महाविद्यालयांकडुन मंजुर करुन पुढील कार्यवाहीस्तव या कार्यालयाकडे ऑनलाईन सादर केले जातात.

उपरोक्त संदर्भ क्रमांक ३ व ४ चे शासन निर्णयान्वये महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसाठीचे विहीत शैक्षणिक शुल्क व विकास निधी इ. शुल्क तत्सम प्राधिका-याकडुन निश्चित केले जाते. त्यानुसार Mahadbt प्रणालिवर सदरील शैक्षणिक शुल्क, विकास निधी, परिक्षा शुल्क व इतर शुल्क इ. ची रक्कम संबंधित सक्षम प्राधिका-यांनी नोंदवलेली जाते. सबब Mahadbt प्रणालीवर महाविद्यालयांच्या लॉगिन आयडी वर दर्शविण्यात आलेल्या शुल्क रचनेची खातरजमा करण्याची जबाबदारी हि शुल्क नियामक प्राधिकरणाची/ संबंधित यंत्रणेची आहे त्याचबरोबर संबंधित सक्षम प्राधिकरणांमार्फत/ यंत्रणेमार्फत मंजुर केलेल्या शुल्करचनेची पुर्नपडताळणी करण्याची जबाबदारी संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्यांची राहिल असे स्पष्ट नमुद केलेले आहे. त्याअन्वये उपरोक्त शासन निर्णयामध्ये नमुद केलेनुसार संबंधीत प्राधिकरणांमार्फत/ यंत्रणेमार्फत दर्शविण्यात/मंजुर करण्यात आलेल्या शुल्क रचनेची वर्षनिहाय व वर्गनिहाय खातरजमा करुनच अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र या प्रवर्गातील पात्र विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुर करुन ऑनलाईन या कार्यालयास सादर करण्यात यावेत.

R/P.G. Admission
PVC/ Aff. T-2
12/03/2021

1.mle
13/3/2021

Circulate among all colleges (Satara)

आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासनाकडुन योग्य ते शुल्क अद्ययावत करुन ते संबंधीत यंत्रणेकडुन मंजुर करुन घ्यावयाचे आहे. तसेच सदर शुल्क मंजुर करतेवळी कमी अथवा जादाचे मंजुर करुन अर्ज या कार्यालयास सादर करण्यात येवु नयेत. आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासनाकडुन कमी अथवा जादाचे म्हणजेच चुकीचे शुल्क मंजुर घेवुन विद्यार्थ्यांकडुन कोणत्याही शुल्काची रक्कम घेऊ नये, तसेच कोणत्याही विद्यार्थ्यांची आर्थिक पिळवणूक करु नये याबाबतची जबाबदारी/ दक्षता महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन व संबंधित शैक्षणिक संस्थेने घेणे आवश्यक आहे. फि कमी अथवा जादा मंजुर झाल्यास याबाबत विद्यार्थी, पालक, विविध संघटना यांचेकडुन या कार्यालयास विचारणा होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे याबाबत आपले महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांनी योग्य ती दक्षता घ्यावी.

उपरोक्त नमुद केलेनुसार सदर बाबत महाविद्यालय व महाविद्यालय प्रशासनाने सदर सुचनांचे उल्लंघन झाल्याचे अढळुण आल्यास महाविद्यालय/ महाविद्यालय प्रशासन यांचेविरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(नितीन उबाळे)
सहायक आयुक्त,
समाज कल्याण, सातारा.

प्रति माहितीस्तव सविनय सादर

१) मा. जिल्हाधिकारीसो, सातारा.
२) मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) मा. संचालक, इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, ३ महापालिका मार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग पुणे.
६) मा. चेअरमन, शुल्क नियामक प्राधिकारण, महाराष्ट्र राज्य मुंबई.
७) मा. कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापुर.
८) मा. कुलगुरु, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी जि. अहमदनगर
९) मा. कुलगुरु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे ता. जि. रायगड
१०) मा. कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
११) मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण पुणे विभाग पुणे.
१२) मा. सह संचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, ४१२ ई शिवाजीनगर पुणे.
१३) मा. शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद सातारा